# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - संगीत विषयावर कविता !
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. वैशाली चंद्रकांत हळबे

---

निसर्गातुनी ऐकू येते,रोज नवे गीत;
ऋतुबदलाच्या झंकारातुन, स्फुरते संगीत !
वसंत उमले पानोपानी, मोहोर दरवळतो,
नवस्पर्शाने-नवसृजनाने, परिसर परिमळतो !

कोकिळ गातो,असते का ती नवनाट्याची नांदी ?
हळव्या कोमल पर्णानेही, सजते फांदी फांदी !
मंदवायूची झुळुक छेडते, मनी सुरांची साद;
ऋतुबदलाच्या झंकारातुन, स्फुरते संगीत !-----1

वर्षाकाळी नाविन्याची उधळण चोहीकडे, नवसुमनांचे, प्राजक्तफुलांचे, सडेच जिकडे तिकडे !
आषाढघनाचे चंचल नर्तन, चातक होई धरती;
श्रवणसरींनी खेळ मांडला, ओल्या भूमीवरती !
झळाळणार्या चैतन्याने आसमंत पुलकित, इंद्रधनूच्या रंगातूनही, खुलते संगीत !----2

बाळाच्या जन्मात उमलते, सुखशांतीची प्रीत
दुडदुडु धावत बाल्य तयाचे, तालावर झुलवीत
तोच आरसा आयुष्याचा, प्रतिबिंब देखणे दिसते; आनंदाच्या अनुभूतीची, तान छेडिता हसते !
देवदूत तो येई, सुंदर रंगावली रेखीत;
आयुष्याच्या परिवलयातुन, झरते संगीत !-----3

संसारी ते ख्याल रंगती, सावरताना तोल;
बहारदार बंदिशीही संगती गोड स्वरांचे बोल !
सूरतालमय गायनात या, मनही अलगद रमते;
भौतिकतेचे वलय भेदुनी, विश्वच सुंदर गमते ! नात्यामधला दुवा होऊनी,कृतार्थ होई संचित;
संस्कारांचे स्रोतही देती, स्नेहल शुभ संकेत !
जन्मभराच्या श्वासामधुनी, असतेच सुरु संगीत !----4

Anand Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

सरगमच्या त्या सात सुरातून, जन्मा येते गीत; शब्दांच्या सुत्रातुन गुंफत,
श्रवणसुभग संगीत !
किमया ज्याची कधी न सरते,
ते शाश्वत सुरेल गीत;
वाद्यातुनही वैविध्याचे, वरदान देत संगीत !
रोज नव्या बदलातून धावे, हा चिरंतनाचा दूत !
गंधर्वांचे स्वरसंमेलन, हे मधुर स्वरसंचयन !
श्रवणमधुर संगीतच आहे, हे सारे जीवन !

Anahat Music Therapy